

# वासरांमधील परजीवींचे नियंत्रण





दुग्धव्यवसाय करतांना वासरांची, करडांची योग्य काळजी, योग्य व्यवस्थापन करणे फार महत्त्वाचे आहे. वासरांमधील परजीवी फार नुकसानदायक ठरतात त्यामुळे वासरांमध्ये पशुवैद्यकाच्या सल्ल्याने त्वरीत उपचार करावे.

**कृमीजन्य परजीवी :**

अस्कॅरीस व्हीटूलोरम हा १०-१५ सें.मी. लांबीचा गोलाकार कृमी आहे. हे कृमी गाई-म्हशीच्या वासरांच्या आतड्यामध्ये वास्तव्य करतात. याची लागण आईच्या गर्भाशयामध्येच होते किंवा जन्मल्यानंतर होऊ शकते. या कृमीची वासराच्या जन्मानंतर आतड्यानंतर पूर्ण कृमी आतड्यामध्ये तयार होतात.

**अपाय :** वासरांच्या पचन संस्थेस हानी पोचवितो, अन्नद्रव्य शोषण करतो. आतड्याच्या संभाव्य हालचालीमध्ये बाधा आणतो. अन्नद्रव्यांचे पचन योग्य पद्धतीने न झाल्याने वासरांचा मृत्यू होतो.

**लक्षणे :** वासरे आव मिश्रित घाण वास येणारे शेण टाकतात. वासराच्या पाठीमागे बाक तयार होतो. वासरू खंगत जाते. म्हशीच्या रेड्यामध्ये या कृमीमुळे होणारे मृत्यूचे प्रमाण लक्षणीय आहे.

**उपाय :** जंतनाशक औषधे वयाच्या तिसऱ्या ते दहाव्या दिवशी द्यावीत. गाभण काळामध्ये पशुवैद्यकाच्या सल्ल्याने कृमीनाशक दिले तर वासरांमध्ये प्रादुर्भाव कमी होतो.

**पट्टकृमी :**

मोनोझीया नावाचे पट्टकृमी गाई-म्हशींची वासरे व शेळ्या-मेंढ्यांच्या कोकराच्या आतडीमध्ये वास्तव्य करतात. यांची लांबी मिटरपेक्षा जास्त असते. ते आपल्या त्वचेवर सतत अन्नद्रव्य शोषण करत असतात. यांचे जीवनचक्र हे खरपड्यामध्ये पूर्ण होते. खरपड्यामधील त्यांची अर्भक अवस्था जनावरांच्या खाण्यात आल्यास लागण होते. गाय, म्हैस यांच्या वासराच्या विष्ठेतून कृमीचे तुकडे गवतावर पडतात. कृमीच्या तुकड्यांतील अंडी गवतावरील खरपडे खातात. त्याच्यामध्ये कृमीची अर्भक अवस्था विकसित होते. गवतासोबत खरपडे पोटात गेल्यामुळे लागण होते. हे पट्टकृमी अन्नशोषण करतात, त्यामुळे वासरे खंगतात. या कृमीचे पिवळसर रंगाचे तुकडे विष्ठेद्वारे बाहेर पडतात यावरून निदान करता येते.

**उपाय :**

१) तत्काळ कृमिनाशक औषधांची शिफारशीत मात्रा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने द्यावी.

२) गवतावरील खरपड्यांची (ऑरीबॅटीड माईट्स) संख्या वाढल्याचे लक्षात आल्यास गवत कापून वाळवून नंतरच पशुधनास खाण्यास द्यावे.

प्रकाशन

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

### आदिजीवजन्य एकपेशीय परजीवी :

### कॉक्सीडीओसिस ( वासरातील रक्ती हगवण ) :

गाई–म्हशीच्या वासरांमध्ये लहानपणी माती चाटण्यास सुरवात झाल्याबरोबर या आदिजीवीची अंडी वासरांच्या पोटात प्रवेश करतात. त्यामुळे या रोगाची लागण होते. आदिजीवीच्या अनेक जाती लागण होते. या आदिजीवीचे जीवनचक्र म्हणजे यांची उशीष्ट (अंडी) विष्ठेद्वारे जमिनीवर टाकली जातात. हे आदिजीव मातीमध्ये विकसित होतात. अशी अंडी खाल्ल्यास त्यांची पुढील वाढ आतड्यातील अन्नद्रव्य शोषण करणाऱ्या पेशी आवरणामध्ये होते. म्हणून आतड्यामध्ये हे आदिजीवी प्रादुर्भाव करतात. आतड्यातील पेशींना इजा पोचल्यामुळे त्यांचे आतड्यातील आवरण बाजूस होऊन यातून रक्तस्त्राव होतो. असे रक्त विष्ठेद्वारे बाहेर येते, म्हणून यास रक्ती हगवण असे म्हणतात. हे आदिजीव आतड्याला इजा पोचवतात, त्यामुळे अन्नद्रव्य शोषण होत नाही. तसेच आतड्यामधून रक्तस्त्राव होतो.

### उपाययोजना :

१) वासरे माती चाटणार नाहीत याची काळजी घ्यावी.

२) माती चाटावयास सुरवात केल्यानंतर शिफारशीत औषधीची मात्रा द्यावी.

३) खनिजयुक्त वीट (मिनरल ब्रीक) गोठ्यामध्ये टांगती ठेवावी, त्यामुळे वासरे माती न चाटता विटेस चाटतील.

### संकरित वासरातील थायलेरिओसिस :

थायलेरिया ॲन्यूलॅटा या रक्तपेशी व लिम्फ ग्रंथीतील लिम्फोसाईट्समध्ये आढळणाऱ्या आदिजीवीमुळे लहान वासरे विशेषतः संकरित गाईंना हा रोग होतो. या आदिजीवीची लागण गोचिडांच्या चावण्यामुळे होते. गोचिडामध्ये या आदिजीवीचे अर्धेअधिक जीवनचक्र पूर्ण होते. यानंतर अशी लागण झालेली गोचिडे चावल्यास यांची लागण होते. या आदिजीवीची सर्वप्रथम वाढ लिम्फ ग्रंथीमध्ये विशेषतः जबड्याखालील लिम्फ ग्रंथीमध्ये होते. म्हणून या रोगाची लागण झाल्यास लिम्फ ग्रंथी सुजतात. या रोगामुळे लिम्फ ग्रंथींना सूज येते, शरीराचे तापमान वाढते. रक्त व लिम्फ पेशींचा नाश व उपचार न केल्यास मृत्यू होतो. या आदिजीवींनी स्त्रवलेला विषारी स्त्राव मृत्यूस कारणीभूत ठरतो.

### उपाय :

१) पशुवैद्यकाद्वारे तत्काळ रोगनिदान व औषधोपचार करून घ्यावा. या रोगाच्या उपचारासाठी इंजेक्शन उपलब्ध आहेत.

२) गोठ्यात गोचीड निर्मूलन आवश्यक आहे. गोचिडापासून वासरांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

### कीटकवर्गीय परजीवी :

### पिसवा व उवा :

पिसवांचे प्रमाण जनावरांमध्ये बरेच असते. शरीरावर उड्या मारत मुक्त वावर करणारे कीटक म्हणजे पिसवा होत. याच्या चावण्यामुळे शरीरावर खाज निर्माण होते. पुरळ व ॲलर्जी तयार होते. पिसवा आपली अंडी गोठ्यात कोरड्या जागेत घालतात. त्यामधून मोठ्या पिसवांचा उगम होतो. विशेषत: पिसवांची लागण खंगत जाणाऱ्या अशक्त वासरांना जास्त होते. कारण त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेली असते. यांच्या चावण्यामुळे वासरांचा प्रसंगी मृत्यूदेखील होतो. उवादेखील वासराच्या बाह्य शरीरावर मोठ्या संख्येने आढळतात. पेशीजन्य शोषण व खाज ही यांची लक्षणे आहेत. हे दोनही परजीवी वासरांना प्रसंगी घातक ठरतात. उवा शरीरावर फिरताना वासरे शरीर चाटतात. त्यामुळे केसाचा गोळा त्यांच्या पोटात तयार होतो.

**उपाययोजना :**

१) गोठ्यात कीटकनाशकांची फवारणी करावी.

२) जनावरांना गोठ्यातील जागा बदलून बांधावी, त्यामुळे पिसवांचा प्रादुर्भाव टाळता येतो. गोठ्याची स्वच्छता ठेवावी.

३) वासरांना मोठ्या जनावरांपासून वेगळ्या गोठ्यात बांधावे.

४) रेडकांना भादरावे.

५) जैविक कीटकनाशकांचा वापर करावा.

**वासरे/ करडावर खरजेचा प्रादुर्भाव :**

सूक्ष्म परजीवी म्हणजेच खरजेचे कीटाणू यामुळे होणाऱ्या या रोगाची शरीरावरील कुठल्याही भागात लागण होते. याचा प्रसार विशेषतः लागण झालेल्या जनावरांच्या सान्निध्यात आल्यामुळे होतो. खाज सुटणे, शरीरावर लागण झालेल्या भागातील केस गळणे, व्रण तयार होणे इ. प्रमुख लक्षणे दिसतात. खाज सुटल्यामुळे वासरे, करडे कठीण ठिकाणी, भिंतीस आपले शरीर घासतात, त्यातून जखमा तयार होतात.

**उपाययोजना :**

१) खरजेच्या कीटाणूंच्या नियंत्रणासाठी शिफारशीत मलम लावावे.

२) वनस्पतिजन्य कीटकनाशके, लिंबोळी तेल, करंज तेल, निलगिरी तेल यांचे साबणाच्या पाण्यातील द्रावण जनावरांच्या शरीरावर लावल्यास खरजेचे कीटाणू मरतात.

३) लागण झालेली जनावरे इतर वासरांच्या संपर्कात येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

४) वासरांना चांगला आहार द्यावा. वेळीच औषधोपचार करावेत.

**गोचिडे :**

वासरांना घातक ठरणारे एकपेशीय आजार जसे की थायलेरीयोसिस, बॅबेसीयोसिस, येहरलरचीओसिस, ॲनाप्लाझमोसिस यांचा प्रसार गोचिडांच्या मार्फत होतो. मोठ्या जनावरांच्या गोठ्यात गोचिडाची वाढणारी संख्या ही वासरांसाठी देखील काळजीचा विषय आहे.

**उपाय :**

१) आठवड्याच्या अंतराने गोठ्यातील गोचिडांची अंडी जाळावीत.

२) वासरांना मोठ्या गुरांच्या गोठ्यापासून वेगळ्या गोठ्यात बांधावे.

३) गोठ्याची स्वच्छता ठेवावी. शिफारशीत कीटकनाशकांची गोठ्यात फवारणी करावी.

४) लिंबोणी तेल, निलगिरी तेल, कारंज तेलाचे साबणाच्या पाण्यातील द्रावण कापडाच्या फडक्याने जनावरांच्या शरीरास लावावे.

५) मोठी गुरे चारतात त्या पडकामध्ये वासरांना चरावयास नेऊ नये. कारण तेथील नवीन गोचिडांच्या अर्भकांची लागण होते.

**आसड्या (माश्यांची अर्भक अवस्था) :**

वासराच्या शरीरावर कुठल्याही कारणाने जखमा होत असतात. तसेच नाळेच्या ठिकाणी हमखास जखम तयार होते. या जखमेवर वेळीच उपचार न केल्यास त्या ठिकाणी घरगुती व इतर जातीच्या माश्या अंडी घालतात. अंड्यातून अळी बाहेर येऊन तेथेच आपले वास्तव्य करते. यामुळे वासरास अत्यंत खाज व वेदना होतात. तसेच याच जिवाणूचा प्रादुर्भाव

होऊन मृत्यू ओढवतो. म्हणून जखमा व आसड्या याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

**उपचार :**

१) जखमा न होण्यासाठी काळजी घ्यावी. नाळ कापल्यानंतर जंतुनाशक लावावे. नाळ स्वच्छ जंतूविरहित कात्रीने कापावी.

२) जखमेवर ताबडतोब मलमपट्टी व औषधोपचार करावेत. तसेच माशीरोधक मलम लावावे.

३) जखमेमध्ये आसड्या झाल्यास जखम योग्य पद्धतीने धुऊन मलमपट्टी लावावी.

४) गोठ्याची जमीन खडबडीत नसावी.

५) गोठ्यात माश्या आकृष्ट होतील असे कुजलेले/ सडलेले पदार्थ ठेवू नयेत.

**घ्यावयाची काळजी :**

- वासरे, करडांना जन्मल्यानंतर वेळेत चीक पाजावा. यामुळे नवजात वासरांची, करडांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
- वासरांना वेळीच शिफारशीत कृमिनाशकाची मात्रा द्यावी.
- करडे व वासरे माती चाटत असल्यास तातडीने औषधोपचार करावा.
- जखमांवर तत्काळ उपचार करून घ्यावा.
- पशुवैद्यकाच्या सल्ल्याशिवाय कुठलेही औषध पाजू नये किंवा औषधोपचार करू नये. कीटनाशकांची योग्य मात्रा शिफारशीत प्रमाणात पाण्यामध्ये मिसळावी. कीटकनाशके ही विषारी असल्यामुळे सर्वतोपरी खबरदारी घ्यावी.




www.mafsu.in

www.knpcvs.in

✲ मार्गदर्शक ✲

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ लेखक ✲

**डॉ. प्रशांत पवार**
पशुपरोपजीवी शास्त्र विभाग
क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.